| | | | |
|---|---|---|---|
| | दाखल तारीख | : | ०९/०४/२०२५ |
| | नोंदणी तारीख | : | १०/०४/२०२५ |
| | निकाल तारीख | : | १४/०५/२०२६ |
| | कालावधी | : | वर्षे महिने दिवस<br>०१ ०१ ०५ |

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी आर्णी, यांचे न्यायालय
(पिठासीन अधिकारी श्रीमती रोशनी दिपक चौबे)

कौ.हिं.म.सं.का.अर्ज क्र.१५/२०२५
निशाणी क्र.१७/ब

१. सुनंदा मांगीलाल चव्हाण,
वय – ४४ वर्षे, व्यवसाय- घरकाम,
२. देवयाणी मांगीलाल चव्हाण,
वय – १३ वर्षे, व्यवसाय- शिक्षण,
३. क्रिष्णा मांगीलाल चव्हाण,
वय – १० वर्षे, व्यवसाय- घरकाम,
तिघेही रा.द्वारा हेमंतसिंग राठोड यांचे घरी,
ता.आर्णी, जि.यवतमाळ ......अर्जदार

विरुध्द

मांगीलाल बिबीचंद चव्हाण,
वय – ४८ वर्षे, व्यवसाय- नोकरी
रा. सोमेश्वरनगर (फुलउमरी),
ता. मानोरा, जि. वाशिम ......गैरअर्जदार

कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ अंतर्गत अर्ज

हजेरी-
अर्जदारातर्फे वकील - श्री. एल.एन.राठोड
गैरअर्जदार तर्फे वकील - प्रकरण एकतर्फा चालविण्यात आले.

न्या य नि र्ण य
(जाहीर तारीखः १४/०५/२०२६)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने महिलांचे कौटूंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा कलम १८ व १९ अन्वये दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे कथन थोडक्यात पुढीलप्रमाणे -

अर्जदार सुनंदा मांगीलाल चव्हाण, ही तिच्या माहेरी राहते. अर्जदार क्र.१ आणि गैरअर्जदार पती-पत्नी असून त्यांचा विवाह १५/०७/२००९ रोजी रामनगर तांडा, ता.जि. यवतमाळ येथे झाला. विवाहानंतर अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदाराकडे नांदावयास गेली. विवाहानंतर सुरूवातीला काही दिवस अर्जदार क्र. १ हिला चांगली वागणूक दिली. पण नंतर गैरअर्जदाराने त्याच्या आई-वडीलांच्या सांगण्यावरून अर्जदाराला मानसिक व शारीरीक त्रास देणे सुरू केले. गैरअर्जदार अर्जदार क्र. १ हिला मारहाण करून उपाशी ठेवत होता तसेच तिला घराबाहेर झोपायला लावत होता. माहेरहून १५ लाख रुपये आण नाही तर घरात राहू नको असे म्हणून तिचा छळ करत होता. अर्जदार क्र. १ ने माहेरची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याचे सांगितल्यावर गैरअर्जदाराने तिला मारहाण व शिवीगाळ करून तिच्या मुलांसह घराबाहेर काढूल टाकले. त्यामुळे महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा कलम १८ व १९ अन्वये अर्जदार क्र. १ ने संरक्षणाचा आदेश मिळण्याची मागणी केली आहे.

३. प्रस्तुत अर्जाकामी गैरअर्जदार हजर झाले नाही. करिता त्यांच्याविरुद्ध दिनांक ०८/०१/२०२६ च्या आदेशाप्रमाणे प्रस्तुतचा अर्ज एकतर्फा चालविण्यात आला.

४. अर्जदारांच्या वकीलांचा युक्तिवाद, तोंडी पुराव्यानुसार न्यायनिर्णयाकरिता खालील मुद्दे उपस्थित झाले त्या मुद्दयांवरील निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढीलप्रमाणे नोंदविण्यात येतात-

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | गैरअर्जदार यांनी अर्जदारांचा कौटुंबिक हिंसाचार केल्याचे अर्जदाराने शाबीत केले आहे का ? | ... होय. |
| २ | अर्जदार हे गैरअर्जदारांविरुध्द संरक्षण आदेशासाठी पात्र आहे का ? | ... होय. |
| ३ | अर्जदार हे गैरअर्जदार यांचेकडून घरभाडे दरमहा रुपये ३०००/- मिळण्यास पात्र आहे का? | होय. दरमहा रुपये ३,०००/- |
| ४ | अर्जदार गैरअर्जदार यांचेकडून पोटगी करिता दरमहा रुपये २०,०००/- मिळण्यास पात्र आहे का ? | होय. दरमहा रुपये ६,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ५ | अर्जदाराने मागणी केल्याप्रमाणे ५० हजार नुकसान भरपाइ मिळण्यास अर्जदार पात्र आहे का ? | ... होय. रुपये १०,०००/- |
| ६ | आदेश काय | अर्ज अंशत: मंजूर. |

<u>का र ण मि मां सा</u>

<u>मुद्दा क्र. १ साठी</u>-

५. अर्जदार हिने तिच्या अर्जाच्या पृष्ठयर्थ तिचे सरतपासाचे शपथपत्र नि.क्र. १० कडे दाखल केले आहे. अर्जदार क्र.१ आणि गैरअर्जदार पती-पत्नी असून त्यांचा विवाह त्यांचा विवाह १५/०७/२००९ रोजी रामनगर तांडा, ता.जि. यवतमाळ येथे झाला. विवाहानंतर अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदाराकडे नांदावयास गेली. सुरूवातीला तिला चांगले वागविले त्यानंतर त्रास देणे सुरू केले. अर्जदाराला मारहाण, घराबाहेर झोपवणे, उपाशी ठेवणे असा त्रास देणे सुरू केले. माहेरहून १५ लाख रूपये आणण्याची मागणी केली व पैसे न आणल्यास घरात राहू नको असे सांगून छळ करण्यात आला. अर्जदाराने आपल्या आई-वडिलांची आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्याचे सांगितले तरीही तिच्यावर अत्याचार सुरूच राहिले. त्यानंतर तिला दोन मुले (एक मुलगी व एक मुलगा) झाले असून त्यांच्यासमोर अर्जदारास शिवीगाळ केली जात होती. गैरअर्जदाराने पत्नीला मुलांसह घराबाहेर काढले. यानंतर अर्जदार क्र. १ हिने तक्रार दाखल केली. परंतू पतीने चांगले वागण्याचे आश्वासन दिल्यामुळे तिने अर्ज मागे घेतला. परंतू २०१९ पासून गैरअर्जदाराने तिचा मानसिक छळ केला. २०२२ मध्ये अर्जदार क्र. १ हिला गर्भाशयाचा त्रास झाला तरी पतीने उपचारासाठी मदत केली नाही व माहेरहून पैसे आणण्यास सांगितले. तब्येत खालावत असल्यामुळे अर्जदार उपचाराकरिता माहेरी निघून आली. परंतू नंतर सुद्धा गैरअर्जदार याचेशी संपर्क केला असता पतीने तिला फोनवर दुसरे लग्न करणार असल्याची धमकी दिली. काही महिन्यांनी नातेवाईकांकडून पतीने दुसरे लग्न केल्याचे तिला समजले. दिनांक १०/०५/२०२२ पासून अर्जदार तिच्या मुलांसह माहेरीच राहत आहे.

६. अर्जदारातर्फे विधीज्ञ श्री.एल.एल.राठोड यांनी युक्तीवाद केला की, गैरअर्जदार यांनी अर्जदार हीचा छळ केलेला असुन तिचेवर कौटुंबिक हिंसाचार केलेला आहे. त्याबाबत तिने तिचे अर्जात व सरतपासाचे शपथपत्रात विस्तृत कथन केलेले आहे. यावरुन गैरअर्जदार

यांनी अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार केल्याचे सिध्द होत आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करण्याची विनंती त्यांनी केली.

७. अर्जदार यांच्या तोंडी व कागदोपत्री पुराव्यातून स्पष्ट होते की, अर्ज, त्यावरील म्हणणे, उपलब्ध कागदपत्रे व अर्जदाराचे प्रतिज्ञापत्र विचारात घेता प्रथमदर्शनी असे दिसून येते की, गैरअर्जदाराने अर्जदारासोबत मारहाण करणे, घराच्या बाहेर झोपायला लावणे, वारंवार माहेरहून पैसे आणण्यास सांगणे तसेच आजारी असताना देखील तिची देखभाल न करणे याप्रमाणे कौटुंबिक हिंसाचार केलेला आहे. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे गैरअर्जदाराने दुसरे लग्न देखील केले आहे.

८. गैरअर्जदाराविरुद्ध प्रकरण एकतर्फा चालविल्याने गैरअर्जदाराचा लेखी जबाब अभिलेखावर नाही. तसेच गैरअर्जदारातर्फे अर्जदाराचा उलटतपास घेण्यात आलेला नाही. गैरअर्जदारातर्फे पुरावा सादर करण्यात आलेला नसल्याने अर्जदार यांचा पुरावा विना अव्हानीत राहिला. गैरअर्जदाराने वाजवी कारणाशिवाय अर्जदार यांचेवर कौटूंबिक हिंसाचार केल्याचे अर्जदार शाबीत करत असल्याचे दिसुन येते. अर्जदारावर अविश्वास दाखविण्याचे कोणतेही कारण अभिलेखावर आलेले नाही. अर्जदाराचे अर्जातील कथन व शपथपत्रातील साक्ष ह्या एकमेकांना पुरक असून त्यावरुन अर्जदार हिचा गैरअर्जदार यांनी कौटुंबिक हिंसाचार केल्याचे अर्जदाराने शाबीत केले आहे, त्यामुळे मुद्दा क्र.१ चे उत्तर मी होकारार्थी नोंदवित आहे.

<u>मुद्दा क्र. २ साठी</u>

९. अर्जदाराने संरक्षण आदेशाची देखील मागणी केली आहे. अर्जदाराचे कथन व पुरावा विचारात घेवून मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी दिला आहे. गैरअर्जदार यांनी अर्जदार हिला मारहाण करून शारिरिक मानसिक छळ करून तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार केल्याचे स्पष्ट झाले आहे. तसेच अर्जदाराकडे वारंवार पैशांची मागणी करून आर्थिक छळ केल्याचे स्पष्ट झाले आहे. गैरअर्जदाराने अर्जदाराचे आजारपणात काळजी घेतलेली नाही. तसेच तिला तिच्या दोन्ही मुलांसोबत घराबाहेर काढून दिले. या सर्व बाबींवरून गैरअर्जदाराने अर्जदारावर शारिरिक, मानसिक, आर्थिक छळ केल्याचे दिसून येते. सबब अर्जदार त्या अनुषंघाने संरक्षण आदेश मिळण्यास पात्र आहे. करिता मी मुद्दा क्र. २ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

<u>मुद्दा क्र. ४ साठी</u>

१०. अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार यांचा विवाह दिनांक १५/०७/२००९ रोजी

रामनगर तांडा, ता.जि.यवतमाळ येथे झालेला असून त्यांना या लग्नबंधनातून देवयाणी नावाची मूलगी व क्रिष्णा नावाचा मुलगा आहे. हि बाब गैरअर्जदार यांनी नाकारलेली नाही. अर्जदाराने वर नमूद केल्याप्रमाणे गैरअर्जदार यांच्याकडून होणाऱ्या छळाबाबत कथन केलेले आहे. तिने सदरच्या बाबी शपथेवर सांगितलेल्या आहेत. तसेच अर्जदाराने कौटुंबिक हिंसाचार अंतर्गत तक्रार दाखल केली होती. परंतू गैरअर्जदाराने अर्जदार क्र. १ हिला चांगल्या प्रकारची वागणूक देण्याची हमी दिली व सर्व अर्जदारांना त्याचे सोबत घेउन गेला. परंतू सन २०१९ पासून गैरअर्जदार अर्जदार क्र. १ सोबत दररोज किरकोळ कारणांवरून वाद घालायचा. यावरून गैरअर्जदारामार्फत नांदविण्यासाठी कोणताही प्रामाणिक प्रयत्न झाल्याचे दिसून येत नाही. वर नमूद केल्याप्रमाणे गैरअर्जदार याने अर्जदार व त्यांच्या मुलांची कोणतीही व्यवस्था केल्याचे दिसून येत नाही. तसेच गैरअर्जदारांनी अर्जदारास कौटुंबिक हिंसाचार केल्याचे स्पष्ट होत आहे. अशा बाबतीत अर्जदार व त्यांच्या मुलांना सांभाळण्याची जबाबदारी हि कायद्याने गैरअर्जदार यांच्यावर आहे. सबब, अर्जदार हि गैरअर्जदार कडून पोटगी मिळण्यास पात्र आहे. करिता मी मुद्दा क्र. ३ चे उत्तर होकारार्थी नोंदवित आहे.

<u>पोटगीच्या रकमेबाबत</u>

११. पोटगीची रक्कम ठरवताना विविध गोष्टींचा विचार होणे आवश्यक आहे. दोन्ही पक्षकारांचे उत्पन्न, त्यांच्या कौटुंबिक व वैयक्तिक गरजा हेदेखील पाहणे आवश्यक आहे. अन्न, वस्त्र व निवारा या दैनंदिन मुलभूत गरजांबरोबरच औषध, आरोग्य व प्रवास खर्च इत्यादी गरजांचा विचार होणे आवश्यक आहे.

१२. अर्जदार हि स्वत:करिता महिन्याकाठी रक्कम रू. १०,०००/- व तिच्या मुलांकरिता प्रत्येकी रक्कम रु. ५,०००/- प्रतिमहा पोटगीची मागणी केलेली आहे. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे गैरअर्जदार क्र. १ प्राध्यापक असून त्याला दरमहा ४० ते ५० हजार वेतन मिळतो. तसेच सुपिक शेतजमिन असून त्यापासून दरवर्षी रू. ५ ते १० लाख रूपयांचे उत्पन्न मिळवतो. तथापि याबाबतचा कोणताही पुरावा अर्जदार हिने दिलेला नाही.

१३. अर्जदार हिचे स्वत:चे काही उत्पन्न नाही असे तिचे कथन आहे. तसेच तिला तिच्या मुलांचा सांभाळ देखील करावा लागत आहे. अर्जदाराच्या मुलांचे वय लक्षात घेता त्यांच्या शिक्षणासाठी, कपडालत्ता, औषधोपचार इ. साठी देखील अर्जदाराला खर्च करावा लागतो. या सर्व गोष्टींचा विचार करता अर्जदार क्र. १ ते ३ हे गैरअर्जदार याचेपासून एकत्रितरित्या दरमहा ६,०००/- मिळण्यास पात्र आहे.

मुद्दा क्र. ३ साठी

१४. अर्जातील कथने व पुरावा तसेच मुद्दा क्र. १ व २ चे निष्कर्ष विचारात घेता, अर्जदार ही आपल्या पतीपासून स्वतंत्र आर्णी येथे राहत आहे, हि बाब स्पष्ट आहे. सर्व अर्जदारांचा सांभाळ करण्याची जबाबदारी गैरअर्जदार यांची आहे. मुद्दा क्र. ४ प्रमाणे गैरअर्जदाराने एकूण रुपये ६,०००/- पोटगी अर्जदाराला देणे अपेक्षित आहे. परंतू, सध्याची वाढती महागाई पाहता, उदरनिर्वाहासाठी ती रक्कम पुरेशी आहे असे म्हणता येणार नाही. अर्जदार हिला स्वतंत्र राहण्याचा अधिकार असल्यामुळे त्याबाबत तिला स्वतंत्र घर/खोली घेण्याचा अधिकार आहे. गैरअर्जदाराचा उत्पन्नाचा स्वतंत्र पुरावा जरी अभिलेखावर नसला तरीदेखील अर्जदाराने केलेले कथन व पुरावा नाकारलेले नाही. सध्याची महागाइ व दैनंदिन जीवन जगत असताना करावा लागणारा खर्च या गोष्टींचा विचार करता, दरमहा रक्कम रुपये ३,०००/- इतके घरभाडे म्हणून देणे योग्य आहे. करिता मुद्दा क्र. ३ साठी मी त्याचप्रमाणे आदेश पारित करत आहे.

मुद्दा क्र. ५ साठी

१५. अर्जदाराने मानसिक व शारिरिक त्रासाबाबत रक्कम रु. ५० हजार इतक्या रकमेची नुकसान भरपाइ म्हणून मागणी केलेली आहे. अर्जदाराने तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे साबित केलेले आहे. तसेच ती आज रोजी माहेरी राहत आहे, हि गोष्ट स्पष्ट आहे की, अर्जदार हिला गैरअर्जदार यांच्या कृत्यामुळे मानसिक व शारिरीक छळ झाला आहे. त्यामुळे तिला नुकसान भरपाई मिळणे आवश्यक आहे. परंतू रक्कम रु. ५० हजार इतकी रक्कम नुकसान भरपाई म्हणून मिळण्याबाबत कोणताही ठोस पुरावा अभिलेखावर दिसून येत नाही. अर्जदार व गैरअर्जदार यांचे एकंदरित परिस्थितीचा विचार करता रक्कम रु.१० हजार इतकी रक्क्म नुकसान भरपाई म्हणून देणे न्यायोचित होणार आहे. करिता मुद्दा क्र. ५ मी त्याप्रमाणे नोंदवित आहे.

मुद्दा क्र. ६ साठी

मुद्दा क्र. १ ते ५ यांच्या निष्कर्षाचा विचार करुन, मुद्दा क्र. ६ चा निष्कर्ष नोंदवितांना मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे -

आ दे श

| | |
|---|---|
| १. | अर्जदार यांचा अर्ज खर्चासह अंश: मंजूर करण्यात येतो. |

| | |
|---|---|
| २. | गैरअर्जदार यांनी स्वतः किंवा इतरांमार्फत अर्जदारावर कौटुंबिक हिंसाचार करु नये, त्यांना कोणताही शारिरिक किंवा मानसिक त्रास देउ नये, अशाप्रकारचा संरक्षणात्मक आदेश पारीत करण्यात येतो. |
| ३. | गैरअर्जदार याने अर्जदाखल तारखेपासून म्हणजेच दि. १०/०४/२०२५ पासून अर्जदार हिला प्रतिमहा रक्कम रु. ६०००/- (अक्षरी रुपये सहा हजार फक्त) इतकी रक्कम पोटगी म्हणून द्यावी. सदरची रक्कम निकाल तारखेपासून एक महिन्याच्या आत द्यावी. |
| ४. | गैरअर्जदार यांनी अर्जदार हिला मानसिक व शारिरिक नुकसानाची भरपाईची रक्कम रू. १०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार फक्त) इतकी रक्कम निकाल तारखेपासून एका महिन्याच्या आत द्यावी. |
| ५. | सदर आदेशाची प्रत संबंधित पोलिस ठाणे व संरक्षण अधिकारी, यवतमाळ यांना देण्यात यावी. |
| ६. | प्रस्तुत अर्जाची प्रत अर्जदार व गैरअर्जदार यांना मोफत देण्यात यावी. |

स्वा/-

ठिकाण- आर्णी (रोशनी दिपक चौबे)

दिनांक- १४/०५/२०२६ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी